FYBMM(M) Eff. Com

XY9AF0

(L)

वेळ : २.३० तास गुण : ७५

सूचना १) सर्व प्रश्न सोडवा.
२) उजवीकडील संख्या गुण दर्शवितात.

प्रश्न १ ला : अ. संवाद म्हणजे काय? संवादाची प्रक्रिया आकृतीसह स्पष्ट करा. (१५)

किंवा

ब. संवादातील भाषिक अडथळे उदाहरणांसह स्पष्ट करा. (१५)

प्रश्न २ रा : अ. माध्यमांतील मौखिक संवादविषयी सांगताना निवेदन, आवाजातील चढउतार, जनसंवाद, मुलाखती यातील वेगळेपण सांगा. (१५)

किंवा

ब. वैचारिकतेचे विविध प्रकार सांगा. अंशिक विचार म्हणजे काय? (०८)

क. श्रवणातील अडथळयांवर कशाप्रकारे मात करता येते. (०७)

प्रश्न ३ रा : अ. सार्वजनिक क्षेत्रातील अ-मौखिक संवादाचे महत्त्व सांगा. (१५)

किंवा

ब. वाचनातील प्रविणता कशी साध्य करायची? सार काढणे (स्किमिंग) आणि अवलोकन (स्कॅनिंग) या वाचनाच्या महत्त्वाच्या प्रकारांविषयी सविस्तर स्पष्टीकरण द्या. (१५)

प्रश्न ४ था : अ. 'जनमाध्यमांत कार्यरत असणाऱ्या व्यक्तींसाठी भाषांतर हे महत्त्वाचे कौशल्य ठरते' यावर टिप्पणी करा. (१५)

किंवा

ब. खालील परिच्छेदाचे इंग्रजी किंवा हिंदीत भाषांतर करा. (१५)

ट्रेन बंद पडल्या. रस्ते वाहतूक ठप्प. प्रवासी धोका पत्करून रेल्वे रुळांवरून चालत आहेत. रस्त्यावर, गल्लीबोळात कुठेही गुडघाभर पाणी, तर कुठे कंबरभर. त्यातून वाट काढत घर गाठण्याची कसरत. गायब झालेले लोकप्रतिनिधी. कुणाचा आधार नाही की

मार्गदर्शन नाही. संकटातून बाहेर पडण्यासाठी प्रत्येकाची व्यक्तिगत पातळीवर चाललेली धडपड. रात्री उशिरा लोकल सुरू झाल्यानंतर मरणाच्या गर्दीत स्वतःला झोकून देणारे प्रवासी.. बुधवारचा संपूर्ण दिवस अत्यंत हालात काढलेल्या मुंबई व परिसरातील लोकांमध्ये एकूणच सरकारी यंत्रणेविषयी कमालीचा रोष निर्माण झाला आहे.

बुधवारच्या पावसात झालेली परवड पाहता यापुढे कुणावर भरवसा ठेवावा, असा प्रश्न मुंबईकरांना पडला आहे. दर पावसाळ्यात मुंबई थांबली की मंदिरात, पालिकेच्या शाळांमध्ये आधार घेत दिवस काढायचा आणि आला दिवस पुढे ढकलायचा, असेच चित्र कायम राहणार का, असा उद्विग्न सवाल होत आहे. रात्री घरी परतण्यासाठी ओला, ऊबरचे दर परवडणारे नव्हते. रिक्षा-टॅक्सी उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे काही किमी पायपीट करण्याची वेळ आली. या सगळ्यात सरकारी यंत्रणांचे अस्तित्वच जाणवत नव्हते. त्यामुळे लोकांमध्ये प्रचंड संताप असून, त्यांच्या कहाण्यांमधून या संतापाच्या ठिणग्या बाहेर पडताना दिसत आहेत.

**प्रश्न ५ वा :** खालीलपैकी कोणत्याही **तीन** टिपा लिहा. (१५)

१. स्माईलीज्.
२. व्हॉईस ओव्हर.
३. मौखिक परीक्षा.
४. टिव्हिवरील निवेदकाची संवादकौशल्ये.
५. समुह चर्चा.